“महाराष्ट्राच्या विधिमंडळातील अतारांकित प्रश्नांचा अभ्यास : विशेष संदर्भ-२०१५-२०२०”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव विज्ञान विद्याशाखेतंर्गत राज्यशास्त्र या विषयातील पीएच.डी. पूर्व संशोधन आराखडा

संशोधक

सोनटक्के हेमंत चांदू

एम.ए., बी.एड.

मार्गदर्शक

डॉ. महेश जैयवंतराव पाटील

(एम.ए, एम.फिल., सेट, नेट, पीएच.डी.)

सहाय्यक प्राध्यापक

नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालय, नांदेड

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

सप्टेंबर : २०२३

प्रस्तावना (Introduction)

भारताने स्वातंत्र्यानंतर संसदीय लोकशाही पध्दतीचा स्वीकार केला. या संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये संसद व राज्य विधिमंडळाचे अत्यंत महत्वाचे योगदान आहे. संसद आणि राज्य विधिमंडळ या दोन्हीं संस्था जनतेच्या आशा, आकांक्षाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महत्वाच्या लोकशाही संस्था आहेत. संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून देश व राज्याने सर्वच क्षेत्रात भरीव अशी प्रगती केलेली आहे. देशाच्या प्रगतीमध्ये संसद आणि राज्य विधिमंडळ यांची भूमिका अत्यंत निर्णायक अशी आहे. कारण या सार्वभौम सभागृहात विविध प्रश्नांवर आणि धोरणांवर साधक बाधक चर्चा होऊन निर्णय घेतले जातात व या निर्णयाची अंमलबजावणी कार्यकारी मंडळामार्फत केली जाते. या शासन पद्धतीचे तीन भाग आहेत. यामध्ये विधिमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांचा समावेश होतो. यांच्या माध्यमातून ही सर्व लोकशाही प्रक्रिया राबवली जाते. विधिमंडळाचे महत्वाचे कार्य म्हणजे धोरण ठरविणे व कायदे तयार करणे आणि कार्यकारी मंडळावर प्रशासनावर नियंत्रण ठेवणे हे आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेत जनता ही सार्वभौम असते. जनतेच्या मताचे प्रतिबिंब लोकनियुक्त संसदेत व राज्य विधानमंडळात पडते. त्यामुळे सार्वभौम अशा जनतेच्या आशा आकांक्षा फलद्रुप करण्याच्या उद्देशाने व प्रशासन चालवण्यासाठी जनकल्याणार्थ कायदे करण्याचे काम संसदेचे व राज्य विधिमंडळाकडे सोपवले आहे. कायद्याची म्हणजेच अधिनियमांची अंमलबजावणी कार्यकारी मंडळ करते व त्याचा अर्थ लावण्याची जबाबदारी न्यायमंडळाकडे सोपवली आहे. शासनाच्या या तीन अंगापैकी संसद व राज्य विधिमंडळाचे काम अत्यंत महत्वाचे आहे. शासनाच्या ध्येयधोरणासंबंधी तसेच जनकल्याणार्थ संसद व राज्य राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसंबंधीचे सर्व निर्णय विधिमंडळात घेतले जातात. विधिमंडळ हे विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून शासनाला दिशा देण्याचे व प्रशासन गतीमान करण्याचे काम अव्याहतपणे करीत आलेले आहे.

भारताच्या घटनात्मक इतिहासातील महत्वाचा टप्पा म्हणजे १९३५ चा भारत सरकार कायदा (Government of India Act, १९३५) अस्तित्वात आला, ज्यात संघराज्यात्मक शासन पध्दती (Federal form of Government) स्वीकारण्यात आली होती. तसेच, प्रांतांना स्वायत्तता देण्यात आली होती. या कायद्यान्वये विधानसभा व सर्व घटक राज्यात विधानपरिषद असे नामाभिधान देऊन दोन सभागृहे (मुंबई प्रांतात १९३७ मध्ये) अस्तित्वात आली. यात मुंबई प्रांताचा सुद्धा समावेस होता.

महाराष्ट्र विधिमंडळाला देशात आगळी-वेगळी अशी प्रतिष्ठा लाभली आहे. अनेकविध क्षेत्रांत देशपातळीवर नेतृत्व देणारे नेते या विधानमंडळाने राष्ट्राला दिले आहेत. या नेत्यांनी संसदीय लोकशाही आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणाद्वारे सबळ प्रशासनाचा वस्तुपाठ इतरांना घालून दिला आहे. त्यामुळे अनेक उत्तम परंपरा, संकेत व आदर्श निर्माण केले आहेत.

लोकप्रतिनिधी या नात्याने कर्तव्य बजावण्यासाठी तसेच शासनाच्या प्रशासनिक कामकाजावर संसद, विधिमंडळाचे प्रभावी नियंत्रण असण्याच्या संशोधन दृष्टीने प्रशासकीय कामकाजासंबंधी माहिती घेणे, शासनाला दिशा देणे, प्रशासनातील त्रुटी, गैरव्यवहार शोधून काढून योग्य त्या उपाययोजना सुचविणे, शासनाला धोरणात्मक मार्गदर्शन करणे हा संसद व राज्य विधिमंडळाचा घटनात्मक अधिकार आहे.

तारांकित, अतारांकित व अल्प सूचना प्रश्न, प्रस्ताव, ठराव, स्थगन प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चा, अल्पकालीन चर्चा, अंतिम आठवडा प्रस्ताव, मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव, विश्वासदर्शक प्रस्ताव इत्यादी संसदीय आयुधांच्या माध्यमातून विरोधी पक्ष किंवा लोकप्रतिनिधी शासनावर नियंत्रण ठेवण्याबरोबर जनकल्याणकारी प्रश्नांची सोडवणूक करण्याचे कार्य करीत असतो. विधिमंडळीय कामकाजामध्ये लोकप्रतिनिधिकडून अतारांकित या संसदीय आयुधाचा सर्वाधिक उपयोगक

केला जातो. त्यामुळे विधिमंडळीय कामकाजात इतर संसदीय आयुधापेक्षा अतारांकित या संसदीय आयुधाला महत्त्वाचे स्थान आहे.

संशोधन समस्या (Research Problem)

संशोधनकार्यात संशोधन समस्येला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. संशोधन समस्या निश्चित केल्याशिवाय संशोधनकार्य करणे अशक्य असते. संशोधनाच्या पायऱ्यामध्ये संशोधन समस्या ही प्रथम पायरी आहे. त्यामुळे संशोधकाला संशोधन करण्यासाठी सर्वप्रथम संशोधन ससस्या निवडणे आवश्यक असते. संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. कारण शासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी लोकप्रतिनिधी व विरोधी पक्षाना तारांकित, अतारांकित व अल्प सूचना प्रश्न, प्रस्ताव, ठराव, स्थगन प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चा, अल्पकालीन चर्चा, अंतिम आठवडा प्रस्ताव, मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव इत्यादी संसदीय आयुधे देण्यात आली आहेत. या सर्व आयुधामध्ये अतारांकित प्रश्नाचे महत्त्व वाढताना दिसून येत आहे. त्यामुळे **“महाराष्ट्राच्या विधीमंडळातील अतारांकित प्रश्नाचा अभ्यास : विशेष संदर्भ २०१५-२०२०”** हा संशोधन विषय निवडण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objective of Research)

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत.

१. महाराष्ट्राच्या विधिमंडळाची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.

२. महाराष्ट्र विधिमंडळाच्या कार्यप्रणालीचा अभ्यास करणे.

३. महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये विविध संसदीय आयुधाचा अभ्यास करणे.

४. महाराष्ट्र विधिमंडळात उपस्थित केलेल्या अतारांकित प्रश्नावा आढावा घेणे.

५. अतारांकित प्रश्नाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रिडा इतर क्षेत्रात अतारांकित प्रश्नाचे योगदान अभ्यासणे.

संशोधनाची गृहीतके (Research Hypothesis)

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

१. महाराष्ट्राच्या विधिमंडळ रचनेसाठी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे.

२. महाराष्ट्राच्या उभारणीत विधिमंडळीय कार्यप्रणालीचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे.

३. महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये विविध संसदीय आयुधाचे योगदान महत्वपूर्ण आहे.

४. महाराष्ट्र विधिमंडळात इतर संसदीय आयुधांपेक्षा अतारांकित या संसदीय आयुधाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे.

५. अतारांकित प्रश्नातून समाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि क्रिडा विषयक प्रश्न सोडवण्यास मदत झाली आहे.

संशोधन विषय निवडीचे महत्त्व (Signification of Research)

संसदीय लोकशाही प्रधान देशामध्ये विरोधी पक्ष हा लोकशाहीचा आत्मा मानला जातो. सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विरोधी पक्ष किंवा लोकप्रतिनिधिला विविध संसदीय आयुधे देण्यात आलेली आहेत. यामध्ये तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न, स्थगन प्रस्ताव, प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, ठराव, अल्पकालीन चर्चा, राज्यपालांचे अभिषाषणावरील चर्चा इत्यादी संसदीय आयुधे देण्यात आलेली आहेत. या संसदीय आयुधांच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी सामान्य जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करणे तसेय शासनावर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वपूर्ण काम करीत असतात. त्यामुळे संसदीय लोकशाही व्यवस्थेत संसदीय आयुधातील अतारांकित प्रश्न या आयुधाचा सर्वाधिक उपयोग राज्य विधिमंडळीय कामकाजाच्या वेळी होत असतो. अतारांकित प्रश्नांच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी शासनाला सविस्तर व मुद्देसुद प्रश्न

विचारतात या प्रश्नाला शासनाकडून प्रश्नानुसार उत्तर देणे महत्त्वाचे असते. या अतारांकित प्रश्नांचे विधिमंडळीय कामकाजात असलेले महत्त्व लक्षात घेता अतारांकित प्रश्नाच्या संदर्भात संशोधन होणे महत्त्वाचे आहे.

संशोधन पद्धती (Research Methodology)

संशोधनाचे प्रामुख्याने व्यावहारिक संशोधन, क्रियात्मक संशोधन आणि मूलभूत सशोधन असे तीन प्रकार पडतात. व्यावहारिक संशोधनातून जे निष्कर्ष समोर येतात त्यांचा उपयोग समाजाचे कल्याण करण्यासाठी होत असतो. हे संशोधन प्रामुख्याने सामाजिक जीवनाच्या व्यवहारांशी संबंधित असते. क्रियात्मक संशोधन आणि व्यावहारिक संशोधन हे परस्पराशी पूरक असून क्रियात्मक संशोधनाचा मुख्य उद्देश वर्तमान परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याचा असतो. उदा.वांशिक तणाव, गलिच्छ वस्ती सुधार, पूर्वग्रह किंवा प्रशासकीय व्यवस्थेतील परिवर्तन यांच्याशी संबंधित असते. तर मूलभूत संशोधनात एखादी घटना, विचार किंवा समाजात उद्धवलेल्या समस्यांचे कारण शोधले जाते. या संशोधनात समस्येचे निदान करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना केल्या जात नाहीत. या संशोधन पद्धतीला गुणात्मक संशोधन असे म्हटले जाते. मूलभूत संशोधन हे अमूर्त किंवा चल घटकांशी संबंधित असल्यामुळे त्यांच्यामध्ये स्थळकाळपरत्वे बदल होत असतात. त्यामुळे प्रस्तुत संशोधन मूलभूत अध्ययनाशी संबंधित असल्यामुळे तुलनात्मक व विश्लेषणात्मक या संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन (Data Collection)

महाराष्ट्र राज्य विधिमंडळात २०१५ ते २०२० या कालखंडात लोकप्रतिनिधी यांच्याकडून विचारात आलेलया अतारांकित प्रश्न संदर्भात प्रश्नावली तयार करून ठराविक प्रतिनिधिची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन प्राथमिक तथ्य संकलन करण्यात येईल. तर द्वितीय

स्त्रोतामध्ये शासकीय अहवाल, प्रकाशने, खाजगी संस्थाचे प्रकाशने, वर्तमानपत्रे, मासिके, एम.फिल व पीएच.डी.चे शोधप्रबंध इत्यादी साहित्याचा उपयोग करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती किंवा मर्यादा (Scope and Limitation of Research)

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे संशोधन सुरू होण्यापूर्वी संशोधनाची निश्चित व्याप्ती आणि मर्यादा ठरविणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे अवकाशात विमानाला निश्चित दिशा दाखविण्याचे काम होकायंत्र करीत असते. त्याचप्रमाणे संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी संशोधनाला मर्यादा असणे आवश्यक असते. संशोधनाला मर्यादा नसेल तर संशोधन कार्य मूळ उद्देशापासून भरकटत असते. प्रस्तुत संशोधनात **"महाराष्ट्राच्या विधीमंडळातील अतारांकित प्रश्नाचा अभ्यास : विशेष संदर्भ २०१५-२०२०"** या विषयाच्या अनुषंगाने विधिमंडळात उपस्थित केलेल्या प्रश्नांचा अभ्यास करणे म्हत्वाचे आहे. ही या संशोधनाची मर्यादा आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये संशोधनाच्या अनुषंगाने इतरकी काही संदर्भ येऊ शकतात.

संशोधनाचा आराखडा (Chapter Scheme)

संशोधनाला व्यवस्थित आकार प्राप्त होण्यासाठी संशोधन विषयाची विभागणी विविध प्रकरणांत पुढीलप्रमाणे केली आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाची प्रस्तावना, विषय निवडणीची भूमिका, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधनाचे महत्त्व, संशोधन पद्धती, संशोधनाची मर्यादा, तथ्य संकलन आणि संशोधन आराखडा इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : विधिमंडळाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणामध्ये विधिमंडळाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेत असताना स्वातंत्र्यापूर्वीचे विधिमंडळाशी संबंधित वेगवेगळे कायदे तसेच संसदीय लोकशाहीशी संबंधित इतर राष्ट्रांच्या महत्त्वपूर्ण घटनांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : महाराष्ट्र विधिमंडळाची रचना व कार्य

प्रस्तुत प्रकरणामध्ये महाराष्ट्र विधिमंडळाची रचना, सभासद संख्या, विधिमंडळातील वेगवेगळ्या समित्या, विधेयक निर्मिती प्रक्रिया इत्यादी घटकांचा आढावा प्रस्तुत प्रकरणामध्ये घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : महाराष्ट्राच्या विधिमंडळातील विविध संसधीय आयुधे

प्रस्तुत प्रकरणामध्ये संसदीय लोकशाहीचा गाभा असलेल्या तारांकित, अतारांकित व अल्प सूचना प्रश्न, प्रस्ताव, ठराव, स्थगन प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चा, अल्पकालीन चर्चा, अंतिम आठवडा प्रस्ताव, मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव, विश्वासदर्शक प्रस्ताव इत्यादी संसदीय आयुधांचा विस्ताराने अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : महाराष्ट्र विधिमंडळातील अतारांकित प्रश्न

प्रस्तुत प्रकरणामध्ये २०१५ ते २०२० या कालावधी दरम्यान विधिमंडळामध्ये लोकप्रतिनिधिनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांचा आढावा घेणे, तसेच विभागानुसार उपस्थित केलेले प्रश्न, सत्ताधारी पक्षातील लोकप्रतिनिधिनी उपस्थित केलेले प्रश्न, विरोधी पक्ष व इतर लोकप्रतिनिधिनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची वर्गवारी आणि अतारांकित प्रश्नाचा शासनाच्या ध्येय धोरणावर पडलेला प्रभाव इत्यादी बाबींचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाअंती गृहीतकृत्यांची पडताळणी, हाती आलेले निष्कर्ष आणि शिफारशी इत्यादीची सवीस्तर मांडणी करण्यात येईल.

संदर्भ्रग्रंथ (Reference)

१. कळसे अनंत, संसदीय लोकशाहीची वैशिष्ट्ये व विधिमंडळाचे कामकाज : एक दृष्टीक्षेप, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई, २०१३

२. कळसे अनंत, संसदीय विशेषाधिकार : एक दृष्टीक्षेप, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय व सचिव राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा मुंबई, विधान भवन मुंबई, नोव्हेंबर २०१४

३. गव्हाणे अजय, संसदीय आयुधे, क्रिएव्टिव प्रकाशन, नांदेड

४. फडिया बी.एल., राजनीति विज्ञान, प्रतियोगीता साहित्य सिरीज, आगरा

५. महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही, विधानभवन मुंबई

६. खेकाळे ना.रा., राजकीय नेतृत्व, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

७. शिरपुरकर महेश, भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया, संपादक द युनिक ॲकडमी पुणे

८. तिजारे रा. अ., आधुनिक राजकीय विश्लेषण

९. गर्गे स.मा., भारतीय समाज विज्ञान कोष, समाज विज्ञान मंडळ प्रकाशन पुणे

१०. वाघमारे जे. एम., सामाजिक न्याय संकल्पना आणि सिध्दी, न्याय विशेषांक, कुंभार नागोराव (संपा), विचारशलाका (त्रैमासिक) अंक १ प्रबोधन प्रकाशन, लातूर, जुलै १९८७

११. भोळे भा. ल. विसावे शतक आणि भारतातील समता विचार आंबेडकर अकादमी, सातारा, जून १९९९, पृ.७६-७७

१२. परिवर्तनाचा वाटसरू, संपादक मंडळ, अभय कांता, तुकाराम जाधव, विजय कुंजीर, प्रकाशक, नर्मदा आफसेट, पुणे

१३. तुकाराम जाधव-संपादक, महाराष्ट्र वार्षिकी २०१५, प्रकाशन, युनिक ॲकॅडमी पुणे,

१४. सी.एस.डी.एस.ची आकडेवारी सुहाय पळसीकर, द इंडियन एक्सप्रेस आणि चाणक्यची आकडेवारी

१५. प्रदीप आगलावे, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती २०००

१६. भारतीय संस्कृतीचा एनसायक्लोपीडिया - एड. पं. महादेवशास्त्री जोशी, अनमोल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००३

१७. पाटील, बा.भा., संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २००६, पुणे

संशोधक

सोनटक्के हेमंत चांदू
एम.ए., बी.एड.

मार्गदर्शक

डॉ. महेश जैयवंतराव पाटील
(एम.ए, एम.फिल., सेट, नेट, पीएच.डी.)
सहाय्यक प्राध्यापक
नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालय, नांदेड